जा.क्र.राआपो/आस्था/३०७८/२०२३
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु)
डॉ.ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई - ४०० ०१८
दिनांक :- २९.०३.२०२३

## पाहिजेत

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथील विविध विषयांच्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांवर ११ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यांसाठी इच्छूक व पात्र उमेदवारांनी दिनांक ०१.०४.२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजता अधिष्ठाता यांच्या दालनात उपस्थित रहावे. तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने उपलब्ध असलेल्या पदांचा विषयनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विषयाचे नांव | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|---|---|
| | | एकूण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) | एकूण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) | एकूण रिक्त पदे (खुला प्रवर्ग) |
| १ | संस्कृत संहिता | ..... | १ | ..... |
| २ | शारीर रचना | १ | १ | ..... |
| ३ | स्वस्थवृत्त | १ | ..... | ..... |
| ४ | शल्यतंत्र | १ | १ (संभाव्य रिक्त होणारे पद) | ..... |
| ५ | कौमारभृत्य | ..... | १ | ..... |
| | **एकूण रिक्त पदे** | **०३** | **०४** | |

अधिष्ठाता
रा.आ. पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु),
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

टिप :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत/रुजू दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून/ पदोन्नतीने किंवा बदलीने संबंधित विषयातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास त्या संबंधित विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी कंत्राटी पध्दतीवरील संबंधित उमेदवारांचा नियुक्तीसाठी वियार केला जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| पदनाम | | प्राध्यापक |
| वयोमर्यादा | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत |
| शैक्षणिक अर्हता | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ ( १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हता अथवा भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, १९७० ( १९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता-<br>२) संबंधित विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल.<br>३) ज्या उमेदवारांचे मूळ शोध निबंध हे, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या आयुर्वेदातील राष्ट्रीय सतरावरील जर्नलच्या सूचीमध्ये किंवा ग्रंथामध्ये प्रसिध्द झाले असतील त्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, वाचण्यांस व बोलण्यांस उमेदवार समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | | शेक्षणिक अर्हतेमधील ( १ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर, प्राध्यापक या पदासाठी संबंधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकूण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल. त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक या पदाचा किमान ५ वर्ष अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| मानधन | | प्रतिमाह रु.१,००,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहून अदा करण्यांत येईल. |

अधिष्ठाता
रा.आ. पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु),
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

टिप :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत/रुजू दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून/ पदोन्नतीने किंवा बदलीने संबंधित विषयातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक पदाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास त्या संबंधित विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदासाठी कंत्राटी पध्दतीवरील संबंधित उमेदवारांचा नियुक्तीसाठी वियार केला जाणार नाही.

| | |
|---|---|
| पदनाम | सहयोगी प्राध्यापक |
| वयोमर्यादा | किमान वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | 1) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२८) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हता अथवा भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांनी वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली समतुल्य अर्हता-<br>२) संबंधित विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेतून प्राप्त केलेली आयुर्वेदाच्या संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी धारण केली असेल.<br>३) ज्या उमेदवारांचे मूळ शोध निबंध हे, भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषदेने मान्यता दिलेल्या आयुर्वेदातील राष्ट्रीय सतरावरील जर्नलच्या सूचीमध्ये किंवा ग्रंथामध्ये प्रसिध्द झाले असतील त्या उमेदवारांना प्राधान्य देंण्यात येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, वाचण्यांस व बोलण्यांस उमेदवार समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतर, ज्याला आयुर्वेदाच्या संबंधित विषयामध्ये एकूण ५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असेल त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधित आयुर्वेदिक विषयाचा सहाय्यक प्राध्यापक या पदाचा पाच वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव असला पाहीजे. |
| मानधन | प्रतिमाह रु.८०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). तसेच सदर मानधन हे अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहून अदा करण्यांत येईल. |

अधिष्ठाता
रा.आ. पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु).
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

| | | | |
|---|---|---|---|
| इतर अटी | | १ | कंत्राटी पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ११ महिन्यांच्या कालावधीनंतर किंवा वयाचे ६५ वर्ष यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. |
| | | २ | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| | | ३ | सदर पदावर नियमित उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी/करार पध्दतीने केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. |
| | | ४ | नियमित नियुक्त आणि कार्यरत असलेल्या अध्यापकांप्रमाणेच उमेदवारास पदाची कर्तव्य आणि जबाबदा-या पार पाडाव्या लागतील व त्यांच्याप्रमाणेच कामाचे तास राहतील तसेच त्यांना प्राप्त होणार कागदपत्र/ माहिती, इतर सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे उमेदवारास आवश्यक राहील. |
| | | ५ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास सार्वजनिक सुट्टी आणि रविवार व्यतिरिक्त नियमानुसार फक्त नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. |
| | | ६ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ३ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ३ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्यांचा/तीचा राजिनामा अधिष्ठातांना मंजूर करता येईल. |
| | | ७ | कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता यांच्याकडून नियमितपणे घेण्यांत येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठातांकडे राहतील. |
| | | ८ | कंत्राटी पध्दतीच्या उमेदवारास विभागप्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपल्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. |
| | | ९ | कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. |
| | | १० | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपूष्टात येईल. |
| | | ११ | नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबधितास बंधनकारक राहील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १२ | अ) कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना(अध्यापकांची) नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी/ सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारात/ग्राहय धरला जाणार नाही अशा आशयाचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.<br><br>ब) शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल करणार नाही अशा आशयाचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील<br><br>क) कंत्राटी पध्दतीने नियुक्त होणा-या उमेदवारांची (अध्यापकांची) नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाही अशा आशयाचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| | | १३ | भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे ऑन लाईन अध्यापक विनियोजन पध्दतीच्या (OTM) पोर्टल वरुन डि-लिंक करवून घेणे तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यवसायीक अधिनियम, १९६१ चे अंतर्गत (MCIM) पंजीयन आवश्यक राहील. |
| | | १४ | कंत्राटी पध्दतीवरील उमेदवारास कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. |
| | | १५ | नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रदद करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |
| | | १६ | उमेदवार अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच उमेदवारांची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order)सोबत असणे आवश्यक राहील. |
| | | १७ | उमेदवाराने वयाची ६५ वर्ष पुर्ण केल्यानंतर त्यांची सेवा आपोआप संपुष्टात/समाप्त करण्यात येईल |
| | | १८ | सदर पदाचे मानधन हे प्राप्त अनुदानातून अदा करण्यांत येत असल्याने अनुदान उपलब्ध होईपर्यंत विलंब होऊ शकतो, त्यासाठी उमेदवारास कार्यालयाकडे कोणताही तगादा लावता येणार नाही. |
| | | १९ | कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यांत आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यांत येणार नाहीत. |
| | | २० | उमेदवारांनी मुलाखतीस येताना आवश्यक त्या सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रती, तसेच अनुभव प्रमाणपत्र, मुळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र सोबत आणने अनिवार्य राहील. |
| | | २१ | प्राध्यापक व सहयोगी प्राध्याकांसाठी अत्युच्च शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे चाळणी निकष लावण्यांत येतील. |

डॉ.संपदा सं.संत,
अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय,वरळी, मुंबई

# ना हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, वैद्य/वैद्या................................ या महाविद्यालयात दिनांक ................ पासून .................या पदावर कार्यरत आहेत. वैद्य/वैद्या............................यांची रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथे प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक या पदावर करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास हे महाविद्यालय त्यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या या मुलाखतीस महाविद्यालयाची व संस्थेची काहीही हरकत नाही.

| संस्थाप्रमुख | प्राचार्य |
| --- | --- |
| ........................... | ........................... |
| ........................... | ........................... |

| | |
| --- | --- |
| ठिकाण : | ठिकाण : |
| दिनांक : | दिनांक : |

इच्छूक उमेदवारांनी www.ayurvedinstitute.com व www.mahayush.gov.in या websites वर उपलब्ध करुन दिलेल्या विहित नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - ४०००१८ येथे दिनांक ०१/०४/२०२३ रोजी Walk-in-interview साठी सकाळी ठिक ०९.०० वाजता उपस्थित रहावे.

प्रथमतः उमेदवाराच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्यांत येईल. तपासणीअंती उमेदवार पात्र ठरल्यासच मुलाखत घेतली जाईल. अर्ज केलेला उमेदवार अपात्र ठरल्यास त्याची जबाबदारी त्या-त्या उमेदवाराची राहील. यास्तव फक्त पात्र उमेदवारांनीच अर्ज करण्यांची दक्षता घ्यावी.

डॉ.संपदा सं.संत,<br>
अधिष्ठाता,<br>
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय,वरळी, मुंबई

अर्जाचा नमुना
महाराष्ट्र शासन
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई - ४०० ०१८

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वतः स्वाक्षरी करणे.

प्रति,
मा.अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी, मुंबई.

विषय :- रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालयातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक ........................ (विषय) या पदावर करार पध्दतीने ११ महिन्यांच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत.

संदर्भ :- आपली जाहिरात दिनांक ........................

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नांव | : | आडनाव | स्वतःचे नांव | वडिलांचे/पतीचे नांव |
| २) | पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोड | : | एसटीडी कोडसह घरचा दुरध्वनी क्रमांक :<br>भ्रमणध्वनी क्रमांक :<br>Email address : | | |
| ३) | नवीन अध्यापक सांकेतांक ( Permanent new CCIM Teacher Code ) | : | | | |
| ४) | जन्मदिनांक | : | | | |
| ५) | ई-मेल | : | | | |
| ६) | दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | : | | | |
| ७) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय | : | वर्ष महिने दिवस | | |
| ८) | राष्ट्रीयत्व | : | | | |

९) शैक्षणिक अर्हता : माध्यामिक/उच्च माध्यमिक परिक्षा/ पदवी/पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्रबाबत नमूद करुन बीएएमएस प्रथम वर्षपासून सुरुवात करावी. सोबत व शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला व सर्व वर्षाच्या साक्षांकित मार्कशिट/प्रमाणपत्र जोडाव्यात.

| अ.क्र. | बोर्डाचे / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी | शासकीय सेवेतून निवृत्त झाले असल्यास, प्रथम नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| | | | | | |

१०) अवगत असणाऱ्या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |

११) कामाचा अनुभव : (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच ग्राह्य धरला जाईल.)

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | अनुभवाचा कालावधी (दि.........ते .........) | विद्यापीठाची मान्यता होती काय? असल्यास विद्यापीठाचे पत्र जोडावे |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१२) प्रकाशित लेखांचा तपशील (लेखांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात)

१३) प्रकाशित पुस्तकांचा तपशील :

१४) पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशील (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात) :

१५) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल :

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |
| ५. | |
| ६ | |
| ७. | |
| ८. | |
| ९. | |
| १०. | |
| ११. | |
| १२. | |
| १३. | |
| १४. | |
| १५. | |
| १६. | |
| १७. | |
| १८. | |
| १९. | |
| २०. | |
| २१. | |
| २२. | |

| | | |
|---|---|---|
| | २३. | |
| | २४. | |
| | २५. | |
| | २६. | |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी................................................ प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वर नमूद केलेली माहीती पूर्णत: खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यांत येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहिरातीत उल्लेखित कारणास्तव नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणूक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

# शपथपत्र

मी श्री/श्रीमती ..............................................प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, जाहिरातील नमूद अटी व शर्तीचे पालन करुन कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल करणार नाही. तसेच शासन/ सक्षम प्राधिकरण/ कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/ आदेशाचे पालन करीन.

**महत्वाची सुचना** :- १) उमेदवारांनी मुलाखतीस येताना सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे व त्याच्या सत्यप्रती आणाव्यात तसेच अनुभव प्रमाणपत्र, मुळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणने अनिवार्य राहील. उमेदवारांना सुचित करण्यांत येते की, आवेदनपत्राचा नमूना अर्हता, अटी ई.बाबतचा सविस्तर तपशिल www.mahayush.gov.in व www.ayurvedinstitute.com या वेबसाईटवरुन संबंधीतांनी सविस्तर माहितीच्या अर्जाचा नमुना प्राप्त करवुन घ्यावा.

डॉ.संपदा सं.संत,
अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय,वरळी, मुंबई